# ४. सुंदरतेची भेट

• ऐका. वाचा.

झुळझुळ वाहे झरा
तयाचे पाणी हो निर्मळ
संथ वाहते नदी घेऊनि
निळसर निर्मळ जल ।।१।।

खट्याळ वारा वाहवाहता
घेऊनि ताजी हवा
कळ्याफुलांचा सुगंध संगे
रोज वाहतो नवा ।।२।।

सूर्य देतसे पिवळे सुंदर
सुवर्णरंगी ऊन
निसर्ग गातो निर्मळ गाणे
लख्ख लख्खशी धून ।।३।।

कुणी शिकवली अशी स्वच्छता
या साऱ्या दूतांना?
निसर्ग झाला गुरू तयांचा
दिला पाठ सर्वांना ।।४।।

जिथे स्वच्छता तिथे देवता
हेच आमुचे ब्रीद
जीवन निर्मळ, परिसर निर्मळ
हीच आमुची जिद्द ।।५।।



– विजया वाड

**शब्दार्थ :** **निर्मळ** – स्वच्छ, पवित्र. **खट्याळ** – खोडकर. **सुवर्णरंगी** – सोन्याच्या रंगाप्रमाणे, चकाकणारे. **दूत** – निरोप किंवा बातमी सांगणारा. **पाठ** – धडा, शिकवण.

## स्वाध्याय

**प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) झरा कसा वाहत आहे?
(आ) निसर्ग कोणाचा गुरू झालेला आहे?
(इ) मुलांच्या मनात कोणती जिद्द आहे?

**प्र. २. जोड्या जुळवा.**

| | 'अ' गट | | 'ब' गट |
|---|---|---|---|
| (१) | पाणी | (अ) | खट्याळ |
| (२) | वारा | (आ) | सुवर्णरंगी |
| (३) | ऊन | (इ) | निर्मळ |

**शिक्षकांसाठी :** कविता तालासुरात, साभिनय म्हणून दाखवावी. विद्यार्थ्यांकडून गटात, तसेच वैयक्तिकरीत्या कविता तालासुरात, साभिनय म्हणून घ्यावी.